# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - १४५

**सभावृत्तांत**

दिनांक :- १५.१२.२००९ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार दिनांक १५.१२.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती - सभापती
२. मा.भोंडवे गणेश तुकाराम
३. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
४. मा.साळुंखे सुरेखा मारुती
५. मा.पिल्ले राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी
६. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
७. मा.कदम निर्मला सद्गुरु
८. मा.अशोक दशरथ सोनवणे
९. मा.जगदीश शंकर शेट्टी
१०. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
११. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे
१२. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
१३. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
१४. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
१५. मा.सौ.सुलोचना बबन बढे

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.झुरे,मा.सावंत,मा.गायकवाड,मा.गायकवाड - सहा.आयुक्त,मा.राजदेरकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.काळे-नगरसचिव,मा.उगीले-शहर अभियंता,मा.चव्हाण-अति.शहर अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.सुरगुडे - विकास अभियंता,मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.साळवी,मा.चव्हाण,मा.बनकर,मा.कुदळे, मा.चिंचवडे,मा.जाधव,मा.निकम,मा.थोरात,मा.कपिले,मा.सवणे,मा.जाधव,मा.पाटील, मा.ढगे-कार्य.अभियंता,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.पाटिल-उपसंचालक (नगररचना),मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.पवार-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले -

विषय क्रमांक ३३) आकुर्डी वॉर्ड क्र.५१ दत्तवाडी येथे जुने शौचालय पाडून नविन २६ सिटस्‌चे दुमजली शौचालय बांधणेबाबत...

विषय क्रमांक ३४) पिंपरी चिंचवड म.न.पा.चे स्थापत्य उद्यान विभागाकडील सन २००९-१० चे स्थापत्य २अ) उद्याने या लेखाशिर्षावरील कामे उद्यान विभागाकडील अंदाजपत्रकातील वृक्षसंवर्धन या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेबाबत...

विषय क्रमांक ३५) दहावी दिवाळी पुस्तक खरेदीबाबत...

विषय क्रमांक ३६) महाराष्ट्र वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियमातील तरतूद, ७४वी घटनादुरुस्ती, पक्षांतरबंदी, महापालिकेच्या कायद्यातील महत्वाच्या तरतूदी इ. विषयांवर प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत...

विषय क्रमांक ३७) निविदा नोटीस क्रमांक ५/८/२००९-१० (E-Tendering) मधील कामाचे करारनामे करणेस मंजूरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक ३८) मनपाचे से.नं.२५ हनुमान मंदिर उद्यान देखभालीचे कामास मुदतवाढ देणेबाबत - मा.भाऊसाहेब सुपे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ३९) शाहुनगर येथील कै.सदाशिव बहीरवाडे क्रिडांगणमधील व्यायाम शाळा देखभाल,संरक्षण चालनकामी सेवाशुल्क तत्वावर देणेबाबत- मा.मनोहर पवार, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४०) मानधनावर घेणेबाबत - मा.मनोहर पवार, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४१) गाळा किक बॉक्सींग प्रशिक्षणासाठी, देखभाल संरक्षण चालनकामी सेवाशुल्क तत्वावर देणेबाबत - मा.भाऊसाहेब सुपे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४२) पेठ क्र.२३ मधील दोन्ही वाहनतळ भाडेतत्वावर देणेबाबत - मा.राजेश पिल्ले, मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४३) मानधनावर नेमणूक करणेबाबत - मा.राजेश पिल्ले, मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४४) सी.एम.ई. (दापोडी) चे जागेत म.न.पा.मार्फत सांस्कृतिक केंद्र बांधणेबाबत - मा.मनोहर पवार, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४५) चिंचवड स्टेशन येथील भाजी मंडई, मच्छी,मटण मार्केटमधील गाळ्याचे भाडे येणे रक्कम निर्लिखीत करणेबाबत - मा.भाऊसाहेब सुपे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४६) आकुर्डी वॉर्ड क्र.५१ दत्तवाडी येथे जुने शौचालय पाडून नवीन २६ सिटस्चे दुमजली शौचालय बांधणे कामाकरीता तरतूद वर्ग करणेबाबत - मा.भाऊसाहेब सुपे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४७) ब प्रभाग कार्यक्षेत्रातील स्मशानभूमींची देखरेख साफसफाई करणेबाबत - मा.जगदीश शेट्टी, मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

---------------

दिनांक ०८.१२.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १४४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------------

ठराव क्रमांक :- १०००५ विषय क्रमांक :- १
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- पाणीपुरवठा
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/जनि/१९०२/०९दि.२६/११/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ड प्रभाग कार्यालयांतर्गत नव्याने विकसित झालेल्या परिसरात पाईपलाईन पुरविणे व टाकणे (थेरगांव, काळेवाडी, वाकड रस्ता) या कामाचे सुधारित अंदाजपत्रकीय र.रू. ११,५८,४३,६२५/- [र.रू.अकरा कोटी अठ्ठावन्न लाख त्रेचाळीस हजार सहाशे पंचवीस] पैकी र.रू.१०,०४,७३,०४५/- चे रकमेस यापुर्वीच मान्यता मिळालेली असल्याने उर्वरित र.रू. १,५३,७०,५७३/- [र.रू.एक कोटी त्रेपन्न लाख सत्तर हजार पाचशे त्र्याहत्तर]) चे रकमेचे सुधारित खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक :- १०००६ विषय क्रमांक :- २
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- पाणीपुरवठा
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु /जनि/१९०१/०९दि.२६/११/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ड प्रभाग कार्यालयांतर्गत पाणीपुरवठ्याच्या वितरण नलिकांचे मजबुतीकरण करणे (थेरगांव, काळेवाडी, जुनी व नवी सांगवी, थेरगांव-वाकड रस्ता) या कामाचे सुधारित अंदाजपत्रकीय र.रू. ४,२७,७०,४५०/- [र.रू. चार कोटी सत्तावीस लाख सत्तर हजार चारशे पन्नास] पैकी र.रू.३,७५,९७,५४९/- चे रकमेस यापुर्वीच मान्यता मिळालेली असल्याने उर्वरित र.रू.५१,७२,९००/- [र.रू.एक्कावन्न लाख बहात्तर हजार नऊशे]) चे रकमेचे सुधारित खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- १०००७ विषय क्रमांक :- ३
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- सुरक्षा
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/१२७९/०९दि.२६/११/०९
विषय :-मे.युनिक डेल्टा फोर्स सि.प्रा.लि.यांचे सुरक्षा रक्षकांकरीता मुदतवाढीबाबत...

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०००८ विषय क्रमांक :- ४
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- विद्युत मुख्य
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सशअ /३८३/०९दि.४/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा मार्फत मुंबई-पुणे हम रस्त्या नजिक असलेल्या चिंचवड येथील मनपाच्या आरक्षित जागेत पीपीपी (Public Private Partnership) तत्वावर विकसीत करणेत येणाऱ्या सिटी सेंटर प्रकल्पासाठी संकल्प नकाशांच्या सादरीकरणासाठी उपस्थित असलेले परिक्षक, अधिकारी यांच्या चहापान, नास्ता व भोजनाचे र.रू.१९,४३३/- चे बील पंचशील हॉटेल यांना अदा करावयाचे असल्याने पंचशील हॉटेल यांना थेट पध्दतीने, करारनामा न करता चहापान, अल्पोपहार व भोजनाचे बील र.रू. १९,४३३/- [र.रू.एकोणीस हजार चारशे तेहतीस] अदा करणेचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०००९ विषय क्रमांक :- ५
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- अ प्रभाग
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.अप्र /नि/कावि/५७५/०९दि.२/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९/२०१० मधील अ.क्र.११८ अन्वये, आकुर्डी एम.आय.डी.सी. विभागातील वॉर्ड क्र.३७, ३८, ३९, ४०, ४१ व ४२ परिसरातील दिवाबत्ती व्यवस्थेची दुरुस्तीचे कामे करणेकामी मे.निशांत इलेक्ट्रीकल्स (नि.र.रू.९,२८,५११/- [र.रू.नऊ लाख अठ्ठावीस हजार पाचशे अकरा] पेक्षा ३३.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००१० विषय क्रमांक :- ६
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- पाणीपुरवठा
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.अति.शहर अभियंता यांचे जावक क्र.पापु/जनि/८०५/०९दि. ३/१२/०९

मा.अति.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.८/०८-०९ मधील अ.क्र.१३ अन्वये, काळेवाडी स.नं.९९ येथे संप व पंप हाऊस साठी वॉचमन क्वॉटर्स बांधणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.शुभम उद्योग (नि.र.रू.३,९१,२९८/- [र.रू.तीन लाख एक्यान्नव हजार दोनशे अठ्ठ्यान्नव] पेक्षा २१.५ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००११ विषय क्रमांक :- ७
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- विद्युत मुख्य
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.वि /नि/कावि/३५१/०९दि.३/१२/०९

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.२/०९-१० मधील अ.क्र.७ अन्वये, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथील विद्युत संच मांडणीचे वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.स्वरूप इलेक्ट्रिकल्स ॲन्ड इंजि. (नि.र.रू.९,३२,९१८/- [र.रू.नऊ लाख बत्तीस हजार नऊशे अठरा] पेक्षा १४.९९ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००१२ विषय क्रमांक :- ८
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- जलशुध्दीकरण केंद्र
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके /वि/४३४/०९दि.५/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

से.क्र.२३ जलशुध्दीकरण केंद्र, निगडी येथील फिल्टर यंत्रणेस वीजपुरवठा करणेकामी दि.१०/११/२००९ रोजी भाडेतत्वावर घेतलेल्या जनित्र संचाचे भाडे र.रू.२८,४००/- [र.रू.अठ्ठावीस हजार चारशे] मे.आर.वडनेरे ॲण्ड सन्स, पुणे या एजन्सीस अदा करणेचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००१३ विषय क्रमांक :- ९
दिनांक - १५.१२.२००९
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-१) मा.स्मिता गुंजेकर,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव -
२) मा.विधी समिती सभा दिनांक ४/१२/२००९ ठराव क्र. २३१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहा.उद्यान निरिक्षक व असि.हार्टिकल्चर सुपरवायझर या अभिनामाच्या मंजुर पदाची शैक्षणिक पात्रता "सरळसेवा प्रवेशाने - कृषि पदविका किंवा तत्सम अभ्यास क्रम व शासकीय किंवा निमशासकीय संस्थेमध्ये २ वर्ष कामाचा अनुभव", अशी असुन त्यामध्ये "कृषी पदविका किंवा तत्सम अभ्यासक्रम व शासकीय किंवा निमशासकीय संस्थेमध्ये १ वर्ष कामाचा अनुभव", असा बदल करण्यास व सहा.उद्यान निरिक्षक व असि.हॉर्टिकल्चर सुपरवायझर या पदांचे पदनाम सहा.उद्यान निरिक्षक असे एकच करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००१४ विषय क्रमांक :- १०
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.सुरेखा साळुंखे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/८/कावि/६३४/०९दि.७/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.स्थायी समितीचे मुळ ठरावानुसार मुळ निविदेच्या रकमेच्या र.रू.८८,३०,३५०/- चे मर्यादेत राहून करारनाम्यातील अटी शर्ती आणि रकमेनुसार आवश्यक तेथे पॅड बायंडींग करणेकामी बाब क्र.२४० करिता मे.आशिष एंटरप्रायजेस यांचे प्राप्त लघुत्तम दर ७/५० प्रती पॅड तसेच बाब क्र.२४६ करिता मे.अमृत मुद्रणालय यांचे प्राप्त लघुत्तम दर १०/५० प्रती पॅड या दरानुसार या निविदेतील प्रस्तावात नमुद साईज मधील छपाई साहित्य ज्या पुरवठाधारकाकडून करण्यात येईल त्यांना सदरचे बायंडींगचे दर लागु राहणार असल्याने या बायंडींग दरांस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००१५ विषय क्रमांक :- ११
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां /१०/कावि/२६९/०९दि.७/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वाहन दुरुस्ती कार्यशाळा विभागासाठी बॅटऱ्या खरेदीकामी निविदा न मागविता करारनामा न करता तातडीची बाब म्हणून मनपास आवश्यक वेगवेगळ्या प्लेटच्या एकूण ५८ नग बॅटऱ्या मे.एक्साईड इंडस्ट्रीज लि. या उत्पादित कंपनीकडून थेट खरेदी करणेस व येणाऱ्या एकूण र.रू.२,२१,४९३/- [र.रू.दोन लाख एकवीस हजार चारशे

त्र्यान्नव] (जकात करासह) खर्चास व सदरची रक्कम मे.एक्साईड इंडस्ट्रीज लि.यांना आगाऊ स्वरूपात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००१६ विषय क्रमांक :- १२
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- नगररचना व विकास यंत्रणा
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.सुरेखा साळुंखे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/४अ१/४६१/०९ दि.३/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या नगररचना व विकास विभागाच्या विशेष भुसंपादन अधिकारी विशेष घटक क्र.१ व २ अस्थापना खर्च या लेखाशिर्षा वरून र.रू.१८ लाख नवीन गावाचे क्षेत्रासाठी विकास योजना तयार करणे व र.रू.३०,०००/- इतर खर्च या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००१७ विषय क्रमांक :- १३
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- जलनि:सारण
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/जनि/कावि/८१७/०९दि.७/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.४/२००९/१० मधील अ.क्र.११ अन्वये, वाकड वेणुनगर वॉर्ड क्र.८८ मधील काळाखडक परिसरात मलनिःसारण नलिका टाकणेकामी मे.महेश उद्योग (नि.र.रू.४६,३३,५५३/- [र.रू.शेहचाळीस लाख तेहतीस हजार पाचशे त्रेपन्न] पेक्षा ३९.९५ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००१८ विषय क्रमांक :- १४
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- ड प्रभाग
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.ड /२/कावि/१३४६/०९दि. /१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील प्रशासन विभागाकडील प्रभाग अध्यक्ष वाहन इंधन या लेखाशिर्षावर सन १९९९-२००० मध्ये र.रू.७५,०००/- तरतूद करणेत आली होती प्रत्यक्षात र.रू. ७६,३७३/- खर्च झाला असल्याने जादा झालेल्या र.रू.१,३७३/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००१९ विषय क्रमांक :- १५
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- ड प्रभाग
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.ड /२/कावि/१३४७/०९दि.५/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील प्रशासन विभागाकडील बोनस तथा सानुग्रह अनुदान या लेखाशिर्षावर सन १९९९-२००० मध्ये र.रू.३,४७,०००/- तरतूद करणेत आली होती प्रत्यक्षात र.रू.३,५२,५७६/- खर्च झाला असल्याने जादा झालेल्या र.रू.५,५७६/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००२० विषय क्रमांक :- १६
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- मुख्य लेखा परिक्षक
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/ १/कावि/२०३९/०९दि.५/१२/०९

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००२१ विषय क्रमांक :- १७
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- संगणक
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.संगणक /१०/कावि/३०८/०९ दि.७/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय येथे विकसीत संगणक प्रणालींचे दुरुस्ती व देखभाल करणेकरिता मे.IIMv यांचे कडील १ Implementer दि.१५/३/२००७ चे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार दि.१४/११/२००९ पासून पुढील ६ महिने कालावधीकरिता नेमणेकरिता मुदतवाढ देणेस व त्याकामी येणाऱ्या र.रू.१,६२,००६/- [र.रू.एक लाख बासष्ठ हजार सहा] या एकूण खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००२२ विषय क्रमांक :- १८
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां /१/कावि/४३१/०९दि.८/१२/०९
विषय :- मनपाच्या विद्युत विभागासाठी XLPE केबल साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००२३ विषय क्रमांक :- १९
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१/कावि/४३०/०९दि.८/१२/०९
विषय :- मनपाच्या विद्युत विभागासाठी स्ट्रीट लाईट ४ x २४ वॅट फिटींग साहित्य खरेदीबाबत...

विषय क्रमांक १९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००२४ विषय क्रमांक :- २०
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- संगणक
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.संगणक/८/कावि/५८८/०९दि.८/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

Tech ९ Services या संस्थेकडील १ full time resource हा website Updation and maintenance च्या कामकाजा करिता र.रू.२०,०००/- [र.रू.वीस हजार] प्रति महा इतक्या रकमेस दि.२७/११/२००९ ते दि.२६/५/२०१० या सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००२५ विषय क्रमांक :- २१
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- आरोग्य मुख्य कार्या.
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमु /४/कावि/५६६/०९दि.१/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

मोशी कचरा डेपो येथे कचऱ्यावर प्रक्रिया करणे या कामाची निकड तसेच निविदा कार्यवाहीसाठी लागणारा कालावधी याचा विचार करता मे.भूमी ॲग्रो सर्व्हिसेस यांचेशी करारनामा न करता थेट पध्दतीने ३५० लि. ई.एम.सोल्युशन द्रावण पुरवठा करणे कामाचा आदेश देण्यात आला असल्याने याकामी येणारा खर्च आरोग्य मुख्यालयाकडील घनकचरा व्यवस्थापन या लेखाशिर्षामधून खर्ची टाकणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००२६ विषय क्रमांक :- २२
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- पाणीपुरवठा
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/जनि/१६९७/०९दि.८/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.४/२००९/१० (E-Tendering) मधील अ.क्र.९ अन्वये, दापोडी येथे वॉर्ड क्र.१०२ मध्ये गणेशनगर येथे नवीन पाईपलाईन पुरविणे व टाकणेकामी मे.पी.व्ही.देशमुख (नि.र.रू.४१,९२,९७०/- [र.रू.एक्केचाळीस लाख ब्यान्नव हजार नऊशे सत्तर] पेक्षा १८.८९ % कमी) [भाववाढ फरक कलमासह] या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००२७ विषय क्रमांक :- २३
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- पाणीपुरवठा व जलनि:सारण
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/जनि/८२५/०९दि.८/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपा फंडातील पाणीपुरवठा व जलनिःसारणाचे कामांची निविदा नोटीस प्रसिध्दीकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे जाहीरात खर्चापोटी दै.डी.एन.ए. यांना र.रू.४,५३,१२०/- [र.रू.चार लाख त्रेपन्न हजार एकशे वीस] व दै.लोकसत्ता यांना र.रू.३,६१,७२८/- [र.रू.तीन लाख एकसष्ठ हजार सातशे अठ्ठावीस] अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००२८ विषय क्रमांक :- २४
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- पाणीपुरवठा व जलनि:सारण
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु /जनि/८२४/०९दि.८/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

JNNURM प्रकल्पातील पापु व जलनिःसारणाचे कामांची निविदा नोटीस प्रसिध्दीकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे जाहीरात खर्चापोटी दै.लोकसत्ता यांना र.रू.१,९०,०८०/- [र.रू.एक लाख नव्वद हजार ऐंशी] व दै.इंडियन एक्सप्रेस यांना र.रू.२,९८,४९६/- [र.रू.दोन लाख अठ्ठ्यान्नव हजार चारशे शहान्नव] अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००२९ विषय क्रमांक :- २५
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- प्रशासन
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/६/कावि/६६८/०९दि.८/१२/०९
विषय :- श्री.शहाजहान अब्दुल मुलाणी - तारतंत्री यांना सेवेतुन काढुन टाकण्यास मान्यता घेणेबाबत...

विषय क्रमांक २५ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००३० विषय क्रमांक :- २६
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- प्रशासन
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/६/कावि/६६४/०९दि.८/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.भारत आत्माराम ढोबळे, संगणक चालक यांच्यावर खातेनिहाय चौकशीमध्ये सिध्द झालेले दोषारोप, अंतिम नोटीसचा त्यांनी सादर न केलेला खुलासा व त्यांच्या गैरहजेरीमुळे संगणक विषयक कामकाजात निर्माण झालेला अडथळा यानुसार श्री.भारत आत्माराम ढोबळे, संगणक चालक यांना सेवेतून काढून टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००३१ विषय क्रमांक :- २७
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- विद्युत मुख्य
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विद्युत/१अ/३४५/०९दि.९/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.४/०९/१० मधील अ.क्र.२ अन्वये, मनपाच्या फुगेवाडी जकातनाका इमारतीसाठी नविन ५० KVA क्षमतेचा जनित्रसंच बसविणे व अनुषंगिक कामे करणेकामी मे.संदिप इंजिनिअरिंग (नि.र.रू.१६,५७,०५६/- [र.रू.सोळा लाख सत्तावन्न हजार छपन्न] पेक्षा २२.७७ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००३२ विषय क्रमांक :- २८
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- लेखा विभाग
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा /१/कावि/१७०८/०९दि.९/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ नुसार महानगरपालिकेचे सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष जमा खर्चाचे वार्षिक लेखे तयार करण्यात आलेले असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००३३ विषय क्रमांक :- २९
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- विद्युत
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/मुंपुमहा.वायसीएमएच/२१८/०९ दि.९/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

यशवंतराव चव्हाण रूग्णालयातील जनरेटर एएमएफ पॅनल वरील २, LT Panel वरील ४ असे एकूण ६ Air circuit breaker चे दुरुस्ती व सर्व्हीसींग करणे कामाचा खर्च मे.रिलायबल इंजीनिअरींग सर्व्हीसेस यांस र.रू.३२,८५७/- [र.रू.बत्तीस हजार आठशे सत्तावन्न] करारनामा न करता अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००३४ विषय क्रमांक :- ३०
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- मुख्य लेखा परिक्षक
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/१८६/०९दि.१०/१२/०९

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२३.११.२००९ ते दि.२९.११.२००९ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१८६/२००९ दि.१०.१२.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००३५ विषय क्रमांक :- ३१
दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- मुख्यलेखापरिक्षक
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जा.क्र.मुलेप/१/कावि/१८७/०९ दि.१०.१२.०९

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.३०.११.२००९ ते दि.६.१२.२००९ अखेर संपणा-या

आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१८७/२००९ दि.१०.१२.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००३६ विषय क्रमांक :- ३२

दिनांक - १५.१२.२००९ विभाग :- उद्यान

सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे

संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान /१/कावि/२४८/०८दि.९/१२/०९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

मनपाच्या उद्यान/वृक्षसंवर्धन विभागाकडील नि.नो.क्र.२/२००९-१० अन्वये, मनपा उद्यानातील सिंचन योजना दुरूस्ती देखभाल करणे कामी मे.आदित्य एंटरप्रायजेस (नि.र.रू.८,४८,०००/- [र.रू. आठ लाख आठ्ठेचाळीस हजार] पेक्षा ७ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आलेले विषय घेणेत आले -

ठराव क्रमांक- १००३७ विषय क्रमांक- ३३

दिनांक- १५.१२.२००९ विभाग- अ प्रभाग स्थापत्य

सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्थापत्य/अप्र/जा/१३३३/०९ दि.१४/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

आकुर्डी वॉर्ड क्र.५१ दत्तवाडी येथे मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन यांचेकडून संडास ब्लॉक बांधणेचे काम निविदा न मागवीता व करारनामा करुन तसेच या कामासाठी बँक गॅरंटी न घेता कामाचे आदेशासोबत निविदा रकमेच्या ५०% आगावू व ५०% काम पुर्ण झाल्यावर ४०% रक्कम आगावू व उर्वरीत १०% रक्कम काम १००% पुर्ण झाल्यावर अदा करणेचे अटीवर करुन घेणेस व त्यासाठी येणारे रक्कम रुपये ४९,४४,०९०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१००३८ विषय क्रमांक- ३४

दिनांक- १५.१२.२००९ विभाग- स्थापत्य उद्यान

सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/उद्यान/का.अ/२३८०/०९ दि.१४/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड म.न.पा.चे स्थापत्य उद्यान विभागाकडील सन २००९-१०चे स्थापत्य-२अ) उद्याने या लेखाशिर्षावरील प्रस्तावात नमूद केलेले कामांसाठी उद्यान

विभागाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील सन २००९-१०चे अंदाजपत्रकातील शिल्लक तरतूदीमधून र.रु.३५.०० लक्ष खर्च टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १००३९ विषय क्रमांक- ३५
दिनांक- १५.१२.२००९ विभाग- माध्यमिक शिक्षण
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.निर्मला कदम
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/३/कावि/८३९/०९दि.१५/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

१८ विद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी दहावी दिवाळी पुस्तक खरेदीकामी र.रु.३२,९६०/- च्या खर्चास व प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास सदर पुस्तक थेट पद्धतीने करारनामा न करता खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १००४० विषय क्रमांक- ३६
दिनांक- १५.१२.२००९ विभाग- उद्यान/वृक्षसंवर्धन
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/३/कावि/२४५/०९दि.१५/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

वृक्षप्राधिकरणाचे २० सदस्य तसेच उद्यान विभागातील ५ अधिकारी असे मिळून एकूण २५ लोकांच्या प्रशिक्षण दौऱ्यास तसेच ऑल इंडिया इन्स्टिटय़ुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांना एकसदस्याचे प्रशिक्षण फी र.रु.६,०००/- तसेच प्रवास व इतर खर्च र.रु.४,०००/- असे प्रत्येकी र.रु.१०,०००/- प्रमाणे येणारे एकूण २५ जणांच्या र.रु.२,५०,०००/- च्या खर्चास व प्रत्येकी र.रु.६,०००/- प्रमाणे डि.डी. अथवा धनादेश मे.महासंचालक अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचे नांव अदा करणेस व उर्वरीत र.रु.४,०००/- प्रत्येकी प्रमाणे उद्यान अधिक्षक (वृक्ष) यांचे नांवे आगावू काढणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१००४१ विषय क्रमांक- ३७
दिनांक- १५.१२.२००९ विभाग- पाणीपुरवठा
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/जनि/१७१०/०९ दि.१४/१२/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.५/२००९-२०१० मधील अ.क्र.८ अन्वये, ब प्रभाग कार्यक्षेत्राअंतर्गत ठिकठिकाणी व्हॉल्व्ह ऑपरेशन करुन पाणीपुरवठा करणेकामी मजुर कर्मचारी पुरविणेकामी मे.राजलक्ष्मी स्वयंम रोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित (र.रू.१,५०,०००/- प्रतिमहा) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. [नि.र.रु.२३,६६,८३४/-)]

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१००४२ विषय क्रमांक- ३८

दिनांक- १५.१२.२००९

सुचक- मा. भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.मनोहर पवार

संदर्भ:-मा.भाऊसाहेब सुपे, मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

मे.सिंधुनगर युवक मित्र मंडळ या संस्थेस मनपाचे से.नं.२५ हनुमान मंदिर उद्यान देखभालीचे कामास प्रतिमहा र.रु.७,१४४/- (र.रु.सात हजार एकशे चव्वेचाळीस) या दराने सध्याचे कामाची मुदत संपलेपासुन पुढील ११ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१००४३ विषय क्रमांक- ३९

दिन२१ांक- १५.१२.२००९

सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे

संदर्भ:-मा.मनोहर पवार,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

मनपा प्रभाग क्र. शाहूनगर येथील कै.सदाशिव बहीरवाडे क्रिडांगणमधील व्यायामशाळा कै.कैलासभाऊ चांदगुडे प्रतिष्ठाण यांस पुढील अकरा वर्षे कालावधीसाठी देखभाल, संरक्षण, चालनकामी द.म.र.रु.२,०००/- सेवाशुल्क तत्वावर देण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१००४४ विषय क्रमांक- ४०

दिनांक- १५.१२.२००९

सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे

संदर्भ:-मा.मनोहर पवार,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

खाली नमूद केलेल्या व्यक्तीस त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या पदी व मानधनावर सहा महिने कालावधीसाठी नेमण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | नांव | पद | र.रु. |
|---|---|---|---|
| १) | जाधव गंगाराम बळीराम | जीवरक्षक / जलतरण प्रशिक्षक | ६,०००/- |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१००४५ विषय क्रमांक- ४१

दिनांक- १५.१२.२००९

सुचक- मा. भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा. मनोहर पवार

संदर्भ:- मा.भाऊसाहेब सुपे,मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

थेरगाव येथील कांतीलालशेठ खिंवसरा व्यायामशाळा इमारतीमधील व्यायामशाळा पहिल्या मजल्यावरील १०X१५ चा गाळा कोब्रा मार्शल आर्ट संस्थेस पुढील पाच वर्षे कालावधीसाठी किक बॉक्सींग प्रशिक्षणासाठी तसेच देखभाल,

संरक्षण, चालनकामी द.म.र.रु.२,०००/- सेवाशुल्क तत्वावर देण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१००४६ विषय क्रमांक- ४२
दिनांक- १५.१२.२००९
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:- मा.राजेश पिल्ले,मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.४९ मधील पेठ क्र.२३ येथील म.न.पा.चे दोन्ही वाहनतळ श्री.संग्राम रामचंद्र येवले,रा.निगडी यांना ५ वर्षे कालावधीसाठी म.न.पा.च्या अटी शर्तीनुसार चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१००४७ विषय क्रमांक- ४३
दिनांक- १५.१२.२००९
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:- मा.राजेश पिल्ले,मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

नागरवस्ती विकास योजना विभागामध्ये समुह संघटक या पदावर अर्चना मोतीराम मेंगडे यांची मानधनावर नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१००४८ विषय क्रमांक- ४४
दिनांक- १५.१२.२००९
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:- मा.मनोहर पवार,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

ठराव क्र.८९९६, दि.१८/८/२००९ म.न.पा.चा स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. २७/०८-०९ अन्वये सी.एम.ई. (दापोडी) चे जागेत म.न.पा. मार्फत सांस्कृतिक केंद्र बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.व्ही.एम.मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर (ई.) प्रा.लि. (नि.र.रु.१,६२,४०,१७९/-) (र.रु.एक कोटी बासष्ट लाख चाळीस हजार एकशे एकोणऐंशी) पेक्षा २.७७% कमी या दराने ठेकेदारास कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. यात २.७७% कमी अधिक भाववाढ फरक अलाहिदा या दराने ठेकेदारास करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे अशी दुरुस्ती करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१००४९ विषय क्रमांक- ४५
दिनांक- १५.१२.२००९
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक-मा.मनोहर पवार
संदर्भ:- मा.भाऊसाहेब सुपे,मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग कार्यालयाचे कार्यक्षेत्रात चिंचवड स्टेशन येथील भाजी मंडई, मच्छी मार्केट व मटण मार्केट बांधणेत आलेले आहेत. सदरचे गाळे सन १९८४ मध्ये गाळेधारकांना वाटप करणेत आले होते. तथापि गेले अनेक वर्षांपासुन सदरचे गाळेधारक मंडई गाळ्याचा वापर करीत नसल्याने मंडई पडीक असुन गाळे भाड्याचीही रक्कम वसुल होत नाही. सन २००४-०५ अखेर सदरच्या गाळेधारकांकडुन येणे असलेली भाजी मंडई गाळा भाडे र.रु.३,८४,४२८/- मच्छी मार्केट गाळा भाडे र.रु.२,१२,३६०/- मटण मार्केट गाळा भाडे र.रु.७,४६,५८५/- याप्रमाणे एकुण र.रु.१३,४३,३७३/- ही वसुल होण्यासारखी नाही. नियमानुसार सदरची रक्कम निर्लिखीत करणे आवश्यक आहे. तरी सदरची रक्कम निर्लिखीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१००५० विषय क्रमांक- ४६
दिनांक- १५.१२.२००९
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक-मा.मनोहर पवार
संदर्भ:-मा.भाऊसाहेब सुपे,मा.मनोहर पवार यांचा प्रस्ताव...

आकुर्डी वॉर्ड क्र.५१ दत्तवाडी येथे जुने शौचालय पाडून नविन २६ सिटस्चे दुमजली शौचालय बांधणे कामाकरीता सन २००९-१० करीता रक्कम रु.८,००,०००/- तरतूद करण्यात आली होती. तथापि सदर कामाची निकड लक्षात घेता कामास रक्कम रु.२५,००,०००/- तरतूद आवश्यक आहे. तरी खालील तक्त्यानुसार अंदाजपत्रकातील इतर कामातून सदर कामास तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | सन २००९-१० मध्ये असलेली तरतूद | सन २००९-१० मध्ये आवश्यक र.रु. | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | आकुर्डी वॉर्ड क्र.५१ दत्तवाडी येथे जुने शौचालय पाडून नवीन २६ सिटस्चे दुमजली शौचालय बांधणे | संडास व मुताऱ्या पान क्र. ७३६ अ.क्र. ६ | ८,००,०००/- | २५,००,०००/- | १७,००,०००/- | --- |
| २) | प्र.क्र.४ म्हेत्रेवाडी चिखली येथे शाळा इमारत बांधणे | प्राथ.दुय्यम शिक्षण पान क्र. ७३४ अ.क्र. ४ | १५,००,०००/- | २,००,०००/- | --- | १३,००,०००/- |
| ३) | वॉ.क्र.६ सोनावणे वस्ती येथे चिखली येथे नवीन | प्राथ.दुय्यम शिक्षण | ५,००,०००/- | १,००,०००/- | --- | ४,००,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शाळा इमारत बांधणे | पान क्र. ७३४<br>अ.क्र. ६ | | | | |
| | | | | | १७,००,०००/- | १७,००,०००/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक-१००५१ विषय क्रमांक- ४७
दिनांक- १५.१२.२००९
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक-मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.जगदीश शेट्टी,मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

अर्जुन आधार स्वयंरोजगार सेवा सह. संस्था या संस्थेस ब प्रभाग कार्यक्षेत्रातील स्मशानभूमींची देखरेख साफसफाईकामी पुढील पाच वर्षे कालावधीसाठी आवश्यक ते स्वयंसेवक किमान वेतन दराने वरील संस्थेस उपलब्ध करुन घेऊन त्यांचेकडून साफसफाई व देखरेख करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/१४३४/२००९
दिनांक - १७/१२/२००९ चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.